## जहिरात (कंत्राटी)

श्री.वसंतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ या संस्थेमध्ये रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता तसेच यवतमाळ जिल्हा हा आदीवासी बहुल जिल्हा आहे. या जिल्यामध्ये बाहेरील राज्यातुन येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक आहे.

त्यामुळे रुग्णसेवा ही सुरळीत चालु राहण्याकरीता या संस्थेमध्ये रिक्त असलेल्या पदांमुळे रुग्णसेवेवर विपरीत परीणाम होणार नाही याकरीता तसेच या संस्थेमध्ये मा.संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे मार्फत नियमित उमेदवार/बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंतच्या कालावधीकरीता शासन निर्णयानुसार मंजुर असलेल्या रुग्णालय आस्थापनेवर मंजुर असलेल्या वैद्यकीय अधिकारी वर्ग - २ ची एकुण २१ पदे व स्त्रि-रुग्णालय आस्थापनेवर एकुण ०२ पदापैकी रिक्त असलेल्या एकुण१३ पदाकरीता स्थानिक स्तरावर कंत्राटी पध्दतीने वा निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरती करावयाची आहे. त्यासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे आहे.

०१) शैक्षणिक अर्हता

पदाचे नाव - वैद्यकीय अधिकारी वर्ग - २ करीता —— एमबीबीएस

०२) मानधन -

पदाचे नाव - १) वैद्यकीय अधिकारी वर्ग - २ (कंत्राटी) करीता —— रु.८०,०००/- एकत्रित व ठोक

अ) - १ सदर उमेदवाराची नियुक्ती शासन निर्णय क्र.एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३ दि. ३१ डिसेंबर २०२० अन्वये एकत्रित ठोक रु. ८०,०००/- (अक्षरी-अंशी हजार फक्त) या मानधनावर नियुक्ती करण्यात येईल. (केवळ वैद्यकीय अधिकारी करीता)

२ वैद्यकीय अधिकारी वर्ग - २ पदाची नियुक्ती फक्त १२० दिवसाचे कालावधी करीता करण्यात येईल.

३ महाराष्ट्र लोकसवा आयोग पुरस्कृत उमेदवार/बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा ईतर संस्थेतुन महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार बदलुन रुजु होई पर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत नियुक्ती करण्यात येईल .

४ त्यांना महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत आपल्या नावाची नोदनी. करणे आवश्यक आहे किंवा भारतीय वैद्यकीय नोदवहित त्यांचे नाव असने आवश्यक आहे. जर त्यांच्याकडे प्रोविजनल रजिस्ट्रेशन असल्यास त्यांनी एक महिण्याच्या आत परमनंट रजिस्ट्रेशन सादर करणे बंधन कारक राहील. अन्यथा त्यांना वेतन व भत्ते अदा केले जानार नाही.

५ नियुक्ती मिळाल्या नंतर संबधित उमेदवारांना तातडीने केवळ ०७ दिवसांचे कालावधीत कर्तव्यावर रुजु होने आवश्यक आहे. तातडीने रुजु न झाल्यास संबधित आदेश रद्द समजण्यात येईल.

६ त्यांच्या या तात्पुरत्या सेवा कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची जाहीरात आल्यास त्यांना आयोगाकडे अर्ज करणे बंधन कारक राहील. या कालावधीत त्यांची आयोगातर्फे निवड झाली नाहीतर त्यांच्या पुढील नियुक्ती साठी विचार केला जानार नाही. त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल तसेच निवड झाल्यास त्यांना महाराष्ट्रातील संचालनालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात नियुक्ती करण्यात येईल.

७.बंधपत्रित उमेदवारांना प्रथम प्राधान्य राहील.

८.श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ या संस्थेमधुन उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

९ त्यांचा खंडीत सेवा कालावधी नियमित करण्यात येणार नाही व त्यांची खंडीत नियुक्ती नवी नियुक्ती समजण्यात येईल. या बाबत कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

१० त्यांनी शासन सेवा सोडतांना एक महिण्याची पुर्व सुचना देणे आवश्यक आहे. न दिल्यास त्यांना नियमानुसार एक महिण्याच्या वेतना ईतकी रक्कम शासन खाती जमा करावी लागेल. त्यांना नियुक्तीच्या वेळी या कार्यालयात संस्था प्रमुखाच्या नावे हमी पत्र देणे आवश्यक आहे, उमेदवार बंधपत्रित असल्यास बंधपत्रित कालावधीत राजीनामा दिल्यास अथवा बंधपत्रित कालावधी पुर्ण केल्यास त्यांना नियमाप्रमाणे उर्वरित बंधपत्रित कालावधीची/बंधपत्राची रक्कम शासनास अदा करावी लागेल.करण्यात येईल.

११ या तात्पुरत्या नियुक्ती मुळे त्यांना जाहिरातीत नमुद केलेल्या पदावर कायम निवडीसाठी हक्क सागता येणार नाही.

१२ त्यांनी कर्तव्यावर रुजु झाल्यावर पंधरा दिवसाच्या आत भारतीय स्टेट बॅक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक आधारकार्ड पॅनकार्ड कार्यालयातील लेखा विभागास सादर करावे. त्याशिवाय त्यांचे वेतन जमा होणार नाही.याची नोदघ्यावी.

१२ ज्या विभागात आपली नियुक्ती करण्यात आली आहे त्याच विभागात नियमानुसार कार्यकरावे लागेल. तसेच नि.वै.अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

१३. आपली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणत्याही वेळी कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल याची नोद घ्यावी.

१४. आपली नियुक्ती वैद्यकीय मंडळाकडील स्वास्थप्रमाणपत्रावर तसेच चारीत्र्य व पुर्वचारीत्र या बाबत पोलीस अधिकाऱ्याकडुन प्राप्त पडताळणी अहवालावर अवलंबुन राहील. त्यांचे स्वास्थ प्रमाणपत्र व पोलीस अहवाल असमाधानकारक असल्याचे आढळुन आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१५.आपण आपल्या तात्पुरत्या नियुक्तीसंबंधात न्यायालयात कोणत्याही प्रकारचा दावा करणार नाही याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**१६. सदर पदावर नियीमत/बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध झाल्यास आपली सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल. व त्यावर आपला कोणताही हक्क राहणार नाही.**

१७. आपली संचालनालयाकडुन बंधपत्रीत उमेदवार म्हणुन शिफारस केल्याचे आढळुन आल्यास आपली तात्पुरती नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१८. निवड करण्यात आलेल्या अमेदवारांना कमीत कमी १२०दिवस पर्यंत सेवा देणे बंधनकारक राहील अथवा आपणास अनुभव प्रमाणपत्र अदा करण्यात येणार नाही.

**१९. निवड झालेल्या उमेदवारांचे काम समाधानकारक असल्यास नियमानुसार एक किंवा दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील आदेश निर्गमित करण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांना राहील**

# Certificates Required (Self attested Zerox copy one set)

1) Mark list of MBBS exam 2) MBBS Degree Certificate / Passing Certificate 3) Attempt Certificate of 1st, 2nd, Final MBBS exam 4) MMC Ragistration 5) MBBS + Additional Qualification Registration 6) Caste Certificate, Validity Certificate and Non Creamy Layer Certificate Where ever applicable 7) Internship Completion Certificate 8) Certificate as bonded candidate from appropriate authority Candidates must bring all original documents at the time of interview9) 10 th bourd certificate

## (( सर्व साधारण अटी))

१) वरील पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होऊ शकतो. २) वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाचा कर्मचारी म्हणता येणार नाही.३) एमएस-सीआयटी परीक्षा पास असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ४) ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत दिनांक व वेळेत प्राप्त होतील त्याच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. ५) उमेदरावारांना मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. ६) सदर पदावर कंत्राटी स्वरुपात नियुक्त झाल्यास दिवस व रात्रपाळीमध्ये काम करावे लागेल. ७) प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती) प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबवण्याचा अधिकार अधिष्ठाता, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ यांना आहे. ८) निवड झालेले उमेदवार निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी (करार ) स्वरुपातील असल्याने ते कधीही व केव्हाही कमी करण्यात येतील. त्यावर त्यांना कोणताही कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही. ०९) नियुक्ती झाल्यानंतर सेवा सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी कोणत्याही सबबीशिवाय कोणत्याही उमेदवाराची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राखुन ठेवले आहेत. १०) अर्जासोबत पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रे (प्रथम/दुवीतीय/तुतीय वर्षाची गुणपत्रिका, पासिंग सर्टीफिकेट, डीग्री (अत्यावश्यक), इतर आवश्यक कागदपत्रे तसेच अनुभव प्रमाणपत्र व पासपोर्ट साईज फोटो व ओळखपत्र (टिसी/आधार कार्ड/पॅन कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट पैकी कोणतेही दोन) जोडाव्यात. (उपरोक्त सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जा सोबत जोडणे आवश्यक राहील) ११) विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी या संस्थेच्या संकेतस्थळावर व संस्थेच्या नोटीस बोर्ड वर दिनांक १५ /०१ /२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल व पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरीता सर्व मुळ प्रमाणपत्रांसह दिनांक १६/०१/२०२४ दुपारी ठिक १२.०० वा. स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.तसेच मुलाखतीकरीता अनुपस्थित असणाऱ्या उमेदवारांच्या अर्जावर विचार करण्यात येणार नाही

१२) मुलाखतीच्या वेळेस सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक राहील व मुळ कागदपत्रे सादर न करण्याच्या उमेदवाराचा अर्ज अग्राह्य ठरविण्यात येईल.

१३) आपणास अर्जासोबत रु.२००/- शासन खाती रोखा विभाग (रुग्णालय) जमा करुन सदरील पावती अर्जासोबत जोडणे अनिवार्य असेल. पावती शिवाय अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही. (रोखा विभाग, रुग्णालय यांना सुचित करण्यात येते की, उमेदवारांच्या अर्जाची फी म्हणुन आपण दिनांक

०2/01 /२०२४रोजीपासुन सदरील उमेदवारांपासुन रु.२००/- घेऊन शासन खाती जमा करावे १४) अर्ज सादर करावयाचा पत्ता - स्व-हस्ते अधिष्ठाता कार्यालय, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील आवक - जावक विभाग

१५) मुलाखतीचे ठिकाण: महाविद्यालय परीषद हॉल, श्री.व.ना. शा. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ

१६) अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक ११ / ०१ /२०२४ कार्यालयीन वेळ संपेपर्यंत

१७) मुलाखतीचा दिनांक १६ / ०१ /२०२४ (वार:मंगळवार ) वेळ .दुपारी१२..वाजता

अधिष्ठाता,
श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
व स्त्रि रुग्णालय, यवतमाळ